# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१९/०७/२०१८
## दि.१८/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २२३/१८,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | देवाशिष धोंगडे, पो.कॉ. वारजे माळवाडी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | अज्ञात वाहन चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०७/२०१८ रोजी १७/५२ वा.मुंबई-बेंगलोर हायवे आर.एम.डी.कॉलेज समोर डूक्कर खिंड कात्रजकडे जाणारे मार्गावर वारजे,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी महिला छाया अमोल कांबळे,वय-३५ वर्षे,रा.रामनगर,म्हसोबा चौक,वारजे,पुणे हया मुंबई-बेंगलोर हायवे रोडने डुक्कर खिंडीकडुन कात्रजकडे आर.एम.डी. कॉलेज समोरून पायी रस्ता ओलांडीत असताना छाया कांबळे हिस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,तीचे मृत्युस कारणीभुत होवुन, अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. गायकवाड ९०९६७५५४०५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ३५९/१८,भादविक २७९,३३७,३३८,४२७,मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | एम.बी.पशाले, पो.हवा. हिंजवडी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | अनोळखी कार चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/३० वा. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे बावधान चौकी येथे बावधन मार्शल म्हणुन रात्रपाळी सरकारी कर्तव्य बजावित असताना,सद्या दुध व्यावसायीकांचा संप असल्याने त्याकरीता सरकारी जीप मधुन फिर्यादी हे त्यांचे वरिष्ठ अधिकारी सहा.पो.निरी.पगारे, पो.हवा.शिंदे व पो.ना.पाटील यांचेसाह चाँदणी चौक ते सुसखिंड असे मुंबई-बेंगलोर हायवे रोडने पेट्रोलिंग करीता दि.१८/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/३० वा. रामनदी बावधान पुणे येथील ब्रीजवर रोडचे कडेला मोपेड पडलेली होती. तसचे बाजुला दोन इसम जखमी अवस्थेत पडलेले असल्याने,फिर्यादी यांनी सरकारी जीप ही रोडचे कडेला घेत असताना,यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचे सरकारी जीपला पाठीमागुन जबर ठोस मारून,जीप मधील सहा.पो. निरी.पगारे, फिर्यादी व त्यांचे सहकारी पो.हवा.शिंदे व पो.ना.पाटील यांना जखमी करण्यास कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पगारे ९०११०००३५५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ५८४/१८,भादविक ३९२,३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | सचिन शिंगे,वय-३२,रा.नखाते वस्ती,रहाटणी,पुणे |
| **आरोपी** | ॲटो रिक्षामधील चार अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०७/२०१८ रोजी ०३/४० वा. नखाते नगर कमाणी जवळ रहाटणी फाटा,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र प्रमोद चंद्रकांत जाधव याचेसह नमुद ठिकाणावरुन रस्त्याने पायी जात असताना,रिक्षा मधुन आलेल्या यातील नमुद इसमांनी फिर्यादी व प्रमोद जाधव यास कोयत्याचा धाक दाखवुन,त्यांना जीवे मारण्याची धमकी देवुन,फिर्यादी यांचे खिशातुन जबरदस्तीने दोन मोबाईल व रोख असा एकुण २१,०७०/- रु किचा ऐवज काढुन घेवुन गेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. माने ७५०७५४२६३१ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ३६०/१८,भादविक ३५३,३२३,५०४ |
| **फिर्यादी** | जहयराम सावळकर,पो.हवा. हिंजवडी वाहतुक विभाग,पुणे शहर |
| **आरोपी** | राजेश वसंत मोगल,वय-३४,रा.इंदिरा शंकर नगरी,पौड रोड,कोथरूड,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०७/२०१८ रोजी सकाळी ११/०० वा. भुमकर चौक वाकड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे सहकारी यांचेसह वाहतुकीचे नियमन करून त्यांचे सरकारी कर्तव्य बजावित असताना,यातील नमुद इसम राजेश मोगल याने त्याचे ताब्यातील कार ही झेब्रा क्रॉसिंगवर थांबविली. त्यावेळी फिर्यादी यांनी त्याची कार मागे थांबण्यास सांगितल्याचे कारणा वरून सदर इसमाने फिर्यादीचे अंगावर धावुन जावुन,त्यांना अपशब्द वापरून,धक्का-बुक्की करून ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. गभाले ८२७५४२७४७६ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २२४/१८,भादविक ४५४,३८०,५११ |
| **फिर्यादी** | मनेश चवरे, वय-३९ वर्षे,रा.फ्लॅट नं-१३,साई विहार सोसायटी,कर्वेनगर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०७/२०१८ रोजी रात्रौ ०९/३० वा.ते दि.१७/०७/२०१८ पहाटे ०४/३० वा.चे दरम्यान फ्लॅट नं.१३, फ्लॅट नं.११, फ्लॅट नं.१४,साई विहार सोसायटी,कर्वेनगर,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट नं.१३ तसेच त्यांचे सोसायटी मधील फ्लॅट नं.११, फ्लॅट नं.१४ असे तिन्ही फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमांनी तीन्ही फ्लॅटचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करण्याचा प्रयत्न करून घरफोडी चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.ना. पांढरे ९९२३१०९७२१ |
| **१** | **<u>दि.१/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>** |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २५८/१८,भादविक ३९२,३४,भारतीय हत्यार का.क.३(२५) |
| **फिर्यादी** | गिरीश निकम, वय-४१,रा.खारघर,नवी मुंबई |
| **आरोपी** | मोटार कार मधील चार अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०७/२०१८ रोजी २२/०० वा. ते दि.१७/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/४५ वा. चे दरम्यान स्वारगेट पुणे ते कळंबोली मुंबई हायवे रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे स्वारगेट बस स्थानक येथुन खारघर,मुंबई येथे जाण्याकरीता यातील नमुद इसमांचे कारमधुन प्रवासी म्हणुन जात असताना,सदर इसमांनी नमुद ठिकाणी फिर्यादी यांना हाताने मारहाण करून,त्यांचेकडील गनचा धाक दाखवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चेन,मोबाईल मधील सिमकार्ड काढुन मोबाईल परत देवुन,फिर्यादी यांचे बँकेचे एटीएम कार्डचा वापर करून त्यांचे खात्यावरून ४१,०००/- रू काढुन घेवुन,फिर्यादीस कळंबोली येथे कार मधुन उतरविले. (सदरचा गुन्हा हा कळंबोली पो स्टे नवी मुंबई येथुन स्वारगेट पो स्टे येथे दाखल झाला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.जे.कदम ९८२३६२४५८५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**